जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३अ/कार्यालयीन वेळ/५५०) 	तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे -- ४११०१६
दिनांक -- ३०/१२/२०१९

प्रति,
संचालक/प्राचार्य/उपसचिव
सर्व शासकीय संस्था/कार्यालये,
यांना माहिती व कार्यवाहीसाठी

संदर्भ - संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक-४अ/आस्था/न्याप्र/२०१९/६५८, दिनांक २४/१२/२०१९

त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाचे अवलोकन करण्यात येवून सदरचे परिपत्रक आपल्या संस्थेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या निर्दशनास आणून पोहोच या कार्यालयास त्वरीत पाठविण्यात यावी. तसेच या कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांनीही परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यालयीन वेळ पाळली जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

**सोबत- संचालनालयाचे परिपत्रक.**

(डॉ. दि.बा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३., महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - ०२२६८५९७४२४/४३४/४७३,

E-mail : desk4a@dtemaharashtra.gov.in Internet :http://www.dte.org.in


परिपत्रक.

क्रमांक :- ४ अ/आस्था/न्याप्र/२०१९/ ६९८

दिनांक :- 24 DEC 2019

विषय : कार्यालयीन वेळेचे पालन करणेबाबत.

संदर्भ : सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. : समय -१०८८/१९/१८(रवका), दि.३१/०८/१९८८

उपरोक्त शासन निर्णयान्वये शासनाने शासकीय कार्यालयाच्या कामकाजाची वेळ बृहन्मुंबई सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.३० व उर्वरित महाराष्ट्र सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ अशी कार्यालयीन वेळ विहित केलेली आहे.

संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, राज्यातील शासकीय तंत्रनिकेतनात संदर्भाधिन शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कार्यालयीन वेळेनुसार तंत्रनिकेतने सुरु नसतात. काही तंत्रनिकेतने संदर्भाधिन शासन निर्णयात नमूद केलेल्या कार्यालयीन वेळेपूर्वी सुरु होतात व वेळेआधीच बंद होतात. त्यामुळे संस्थेत येणाऱ्या विद्यार्थी/अभ्यागतांची गैरसोय होत असते.

या परिपत्रकाद्वारे सर्व शासकीय तंत्रनिकेतनांना सूचित करण्यात येते की, शासनाने विहित केलेल्या कार्यालयीन वेळेत शासकीय तंत्रनिकेतने सुरु असणे आवश्यक आहे. सदर वेळेत संस्थेतील अधिकारी / कर्मचारी संस्थेतच उपस्थित असणे बंधनकारक आहे. संदर्भाधिन शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे कार्यालयीन वेळ पाळली जाईल याची दक्षता घ्यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाही करीता

१. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये
२. सर्व प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने